Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

# श्री. ललित कुमार चंदेल यांची बँक ऑफ महाराष्ट्राच्या संचालक मंडळावर नियुक्ती

**पुणे दि. 19 ऑगस्ट 2021:** भारत सरकारने आपल्या माहिती आदेश क्र. इएफ क्र. 6/3/2012 - बी.ओ. 1 (खंड 2) दि. 18 ऑगस्ट 2021 अन्वये श्री. ललित कुमार चंदेल यांची बँक ऑफ महाराष्ट्रच्या संचालक मंडळावर भारत सरकार नियुक्त संचालक म्हणून दि. 18 ऑगस्ट 2021 पासून नियुक्ती केली आहे.

श्री. ललित कुमार भारतीय आर्थिक सेवा - इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस (IES) (1995 ची तुकडी) चे अधिकारी आहेत. सध्या ते आर्थिक सल्लागार, वित्तीय सेवा विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली या पदावर आहेत. श्री. ललित कुमार यांनी अर्थशास्त्रातील पदव्युत्तर पदवी, एम.बी.ए. आणि फेलो ऑफ इन्शुरन्स या पदव्या प्राप्त केल्या आहेत.

त्यांच्या सध्याच्या पदनियुक्तीपूर्वी श्री. ललित कुमार आय.सी.आय.सी.आय. बँक लि. च्या संचालक मंडळावर सरकार नियुक्त संचालक होते. त्यांनी भारत सरकारच्या विविध विभागांमध्ये अनेक पातळ्यांवर काम केले आहे, ज्यात बँकिंग, विमा क्षेत्र, भांडवल बाजार, परकीय मदत, ग्रामीण विकास, उर्जा, सिंचन आणि आरोग्य यांचा समावेश आहे. त्यांनी संचालक (विमा), वित्तीय सेवा विभाग, अर्थ मंत्रालय, कार्यकारी संचालक, सीव्हीओ आणि वित्तीय सल्लागार, विमा नियंत्रण आणि विकास प्राधिकरण (IRDA) आणि पूर्णवेळ संचालक (वित्त) तेलंगण राज्य विद्युत निर्मिती कंपनी या पदांवर काम केले आहे.

IES अधिकारी असलेल्या श्री. ललित कुमार यांची सुरुवातीची नियुक्ती संशोधन अधिकारी, सिंचन आणि CAD विभाग, म्हणून तत्कालीन योजना आयोगामध्ये झाली होती. त्यांच्याकडे गुंतवणुक स्पष्टता देण्यासाठी सिंचन प्रकल्पांची प्रकरणे तपासण्याचे काम होते.

यापूर्वी श्री. ललित कुमार यांनी भारत सरकार नियुक्त संचालक म्हणून नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि., ओरिएण्टल इन्शुरन्स कं. लि., कॉर्पोरेशन बँक, अग्रिकल्चरल इन्शुरन्स कंपनी ऑफ इंडिया आणि नॅशनल इन्शुरन्स अकादमी या ठिकाणी काम केले.

***